श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता दशमो अध्याय मराठी



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**

**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन, (उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**

**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।

**श्रीमद्भगवद्गीतायां(न्)**

**दशमोऽध्याय:**

**श्रीभगवानुवाच**

**भूय एव महाबाहो, श्रृणु मे परमं(वँ) वचः ।**

**यत्तेऽहं(म्) प्रीयमाणाय, वक्ष्यामि हितकाम्यया ॥ 1 ॥**

श्री भगवान म्हणाले , हे महाबाहो !आणखीही माझे परम रहस्यमय आणि प्रभाव युक्त म्हणणे ऐक .जे मी अतिशय प्रेमी अशा तुला तुझ्या हितासाठी सांगणार आहे .

**न मे विदुः(स्) सुरगणाः(फ्), प्रभवं(न्) न महर्षयः ।**

**अहमादिर्हि देवानां(म्), महर्षीणां(ञ्) च सर्वशः ॥ 2 ॥**

माझी उत्पत्ती अर्थात् लीलेने प्रकट होणे ना देव जाणत ना महर्षी कारण मी सर्व प्रकारे देवांचे व महर्षींचे आदि कारण आहे .

**यो मामजमनादिं(ञ्) च, वेत्ति लोकमहेश्वरम् ।**

**असम्मूढः(स्) स मर्त्येषु, सर्वपापैः(फ्) प्रमुच्यते ॥ 3 ॥**

जो मला वास्तविक जन्म रहित ,अनादी आणि लोकांचा महान ईश्वर असे तत्वतः जाणतो , तो मनुष्यात ज्ञानी असणारा सर्व पापांपासून मुक्त होतो .

**बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः(ह), क्षमा सत्यं(न्) दमः(श्) शमः ।**

**सुखं(न्) दुःखं(म्) भवोऽभावो, भयं(ञ्) चाभयमेव च ॥ 4 ॥**

**अहिं(म्)सा समता तुष्टिस्- तपो दानं(यँ) यशोऽयशः ।**

**भवन्ति भावा भूतानां(म्), मत्त एव पृथग्विधाः ॥ 5 ॥**

निर्णय शक्ती ,यथार्थ ज्ञान, असं मूढता ,क्षमा ,सत्य ,इंद्रिय निग्रह ,मनोनिग्रह ,सुखदुःख ,उत्पत्ती प्रलय,भयअभय ,अहिंसा ,समता,संतोष ,तप,दान ,कीर्ती अपकीर्ती असे हे प्राण्यांचे अनेक प्रकारचे भाव माझ्यापासूनच होतात .

**महर्षयः(स्) सप्त पूर्वे, चत्वारो मनवस्तथा ।**

**मद्भावा मानसा जाता, येषां(लँ) लोक इमाः(फ्) प्रजाः ॥ 6 ॥**

सात महर्षी त्यांच्याही पूर्वी असणारे चार सनकादिक तसेच स्वायंभूवइत्यादी 14 म्हणून हे माझ्या ठिकाणी भाव असलेले सर्वच माझ्या संकल्पाने उत्पन्न झाले आहेत .या जगातील सर्व प्रजा त्यांचीच आहे .

**एतां(वँ) विभूतिं(यँ) योगं(ञ्) च, मम यो वेत्ति तत्त्वतः ।**

**सोऽविकम्पेन योगेन, युज्यते नात्र सं(म्)शयः ॥ 7 ॥**

जो पुरुष माझ्या ह्या परमैश्वर्यरूपविभूतीला आणि योगशक्तीला तत्वतः जाणतो तो स्थिरभक्ती योगाने व्यक्त होतो यात मुळीच शंका नाही .

**अहं(म्) सर्वस्य प्रभवो, मत्तः(स्) सर्वं(म्) प्रवर्तते ।**

**इति मत्वा भजन्ते मां(म्), बुधा भावसमन्विताः ॥ 8 ॥**

मी वासुदेवच सर्व जगाच्या उत्पत्तीचे कारण आहे आणि माझ्यामुळेच सर्व जग क्रियाशील होत आहे असे जाणून श्रद्धा व भक्तीने युक्त असलेले बुद्धिमान फक्त मज परमेश्वरालाच नेहमी भजतात .

**मच्चित्ता मद्गतप्राणा, बोधयन्तः(फ्) परस्परम् ।**

**कथयन्तश्च मां(न्) नित्यं(न्), तुष्यन्ति च रमन्ति च ॥ 9 ॥**

त्या नेहमी माझे ध्यान वगैरे मग्न झालेल्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्तांना मी तो तत्त्वज्ञानरूप योग देतो .ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात .

तेषां(म्) सततयुक्तानां(म्), भजतां(म्) प्रीतिपूर्वकम् ।

ददामि बुद्धियोगं(न्) तं(यँ), येन मामुपयान्ति ते ॥ 10 ॥

त्या नेहमी माझे ध्यान वगैरे मग्न झालेल्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्तांना मी तो तत्त्वज्ञानरूप योग देतो .ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात .

तेषामेवानुकम्पार्थ- महमज्ञानजं(न्) तमः।

नाशयाम्यात्मभावस्थो, ज्ञानदीपेन भास्वता ॥ 11 ॥

हे अर्जुना ! त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांच्या अंतःकरणात असलेला मी स्वतःच त्यांच्या अज्ञानाने उत्पन्न झाले लाअंधकार प्रकाशमय तत्त्वज्ञानरूप दिव्याने नाहीसा करतो .

अर्जुन उवाच

परं(म्) ब्रह्म परं(न्) धाम, पवित्रं(म्) परमं(म्) भवान्।

पुरुषं(म्) शाश्वतं(न्) दिव्य-मादिदेवमजं(वँ) विभुम् ॥ 12 ॥

आहुस्त्वामृषयः(स्) सर्वे, देवर्षिर्नारदस्तथा ।

असितो देवलो व्यासः(स्), स्वयं(ञ्) चैव ब्रवीषि मे ॥ 13 ॥

अर्जुन म्हणाला ,आपण परम ब्रह्म ,परमधाम आणि परमपवित्र आहात .कारण आपल्याला सर्व ऋषीगण सनातन ,दिव्यपुरुष ,तसेच देवांचाही आदि देव ,अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणतात .देवर्षी नारद ,असित ,देवल व महर्षी व्यास ही तसेच सांगतात आणि आपणही मला तसेच सांगता .

सर्वमेतदृतं(म्) मन्ये, यन्मां(वँ) वदसि केशव ।

न हि ते भगवन्व्यक्तिं(वँ), विदुर्देवा न दानवाः ॥ 14 ॥

हे केशवा !जे काही मला आपण सांगत आहात ,ते सर्व मी सत्य मानतो .हे भगव न !आपल्या लीलामय स्वरूपाला ना दानव जाणत ना देव .

स्वयमेवात्मनात्मानं(वँ), वेत्थ त्वं(म्) पुरुषोत्तम ।

भूतभावन भूतेश, देवदेव जगत्पते ॥ 15 ॥

हे भूतांना उत्पन्न करणारे !हे भुतांचे ईश्वर !हे देवांचे देव !हे जगाचे स्वामी !हे पुरुषोत्तम !तुम्ही स्वतःच आपण आपल्याला जाणत आहात .

वक्तुमर्हस्यशेषेण, दिव्या ह्यात्मविभूतयः ।

याभिर्विभूतिभिर्लोका- निमां(म्)स्त्वं(वँ) व्याप्य तिष्ठसि ॥ 16 ॥

म्हणून ज्या विभूतींच्या योगाने आपण या सर्व लोकांना व्यापून राहिला आहात ,त्या आपल्या दिव्य विभूती पूर्णपणे सांगायला आपणच समर्थ आहात .

कथं(वँ) विद्यामहं(यँ) योगिं(म्)स्- त्वां(म्) सदा परिचिन्तयन् ।

केषु केषु च भावेषु, चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ 17 ॥

**हे योगेश्वर !मी कशाप्रकारे निरंतर चिंतन करीत आपल्याला जाणावे आणि हे भगव न् !आपण कोण कोणत्या भावात माझ्याकडून चिंतन करण्यास योग्य आहात ?**

विस्तरेणात्मनो योगं(वँ), विभूतिं(ञ्) च जनार्दन ।

भूयः(ख्) कथय तृप्तिर्हि, श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ 18 ॥

**हे जनार्दना !आपली योगशक्ती आणि विभूती पुन्हा ही विस्ताराने सांगा .कारण आपली अमृतामय्या वचने ऐकत असता माझी तृप्ती होत नाही . अर्थात्ऐकण्याची उत्कंठा अधिकच वाढत राहते .**

श्रीभगवानुवाच

हन्त ते कथयिष्यामि, दिव्या ह्यात्मविभूतयः ।

प्राधान्यतः(ख्) कुरुश्रेष्ठ, नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥ 19 ॥

**श्री भगवान म्हणाले ,हे कुरुश्रेष्ठा !आता मी ज्या माझ्या दिव्य विभूती आहे त ,त्या मुख्य मुख्य अशा तुला सांगेन .कारण माझ्या विस्ताराला शेवट नाही .**

अहमात्मा गुडाकेश, सर्वभूताशयस्थितः ।

अहमादिश्च मध्यं(ञ्) च, भूतानामन्त एव च ॥ 20 ॥

**हे अर्जुना !मी सर्व भूतांच्या हृदयात असलेला सर्वांचा आत्मा आहे .तसेच सर्व भूतांचा आदी ,मध्य आणि अंतही मीच आहे .**

आदित्यानामहं(वँ) विष्णुर्- ज्योतिषां(म्) रविरं(म्)शुमान् ।

मरीचिर्मरुतामस्मि, नक्षत्राणामहं(म्) शशी ॥ 21 ॥

**आदितीच्याबारा पुत्रांपैकी विष्णू मी आणि ज्योतींमध्ये किरणांनी युक्त सूर्य मी आहे .49 वायू देवतांचे तेज आणि नक्षत्रांचा अधिपती चंद्र मी आहे .**

वेदानां(म्) सामवेदोऽस्मि, देवानामस्मि वासवः ।

इन्द्रियाणां(म्) मनश्चास्मि, भूतानामस्मि चेतना ॥ 22 ॥

**वेदांतसामवेद मी आहे .देवात इंद्र आहे .इंद्रियांमध्ये मन आहे आणि भूत प्राण्यांमधील चेतना म्हणजे जीवनशक्ती मी आहे .**

रुद्राणां(म्) शङ्करश्चास्मि, वित्तेशो यक्षरक्षसाम् ।

वसूनां(म्) पावकश्चास्मि, मेरुः(श्) शिखरिणामहम् ॥ 23 ॥

**अकरा रुद्रांमध्ये शंकर मी आहे आणि यक्ष व राक्षसांमध्ये धनाचा स्वामी कुबेर मी आहे .मी आठ वसूंमधलाअग्नि आहे आणि शिखरे असणाऱ्या पर्वतांमध्ये सुमेरू पर्वत मी आहे .**

पुरोधसां(ञ्) च मुख्यं(म्) मां(वँ), विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।

सेनानीनामहं(म्) स्कन्दः(स्), सरसामस्मि सागरः ॥ 24 ॥

पुरो हितांमध्येमुख्य बृहस्पती मला समज.हे पार्था!मी सेनापती मधला स्कंद आणि जलाशयामध्ये समुद्र आहे .

महर्षीणां(म्) भृगुरहं(ङ्), गिरामस्म्येकमक्षरम् ।

यज्ञानां(ञ्) जपयज्ञोऽस्मि, स्थावराणां(म्) हिमालयः ॥ 25 ॥

मी मारशील मध्ये भृगूआणि शब्दांमध्ये एक अक्षर अर्थात ओंकार आहे .सर्व प्रकारच्या यज्ञांमध्ये जप यज्ञ आणि स्थिर राहणाऱ्यांमध्ये हिमालय पर्वत मी आहे .

अश्वत्थः(स्) सर्ववृक्षाणां(न्), देवर्षीणां(ञ्) च नारदः ।

गन्धर्वाणां(ञ्) चित्ररथः(स्), सिद्धानां(ङ्) कपिलो मुनिः ॥ 26 ॥

सर्व वृक्षांत पिंपळ आणि देवर्षींमध्ये नारद मुनी,गंधर्वांमध्ये चित्ररथ आणि सिद्धांमध्ये कपिलमुनींनी आहे .

उच्चैः(श्)श्रवसमश्वानां(वँ), विद्धि माममृतोद्भवम् ।

ऐरावतं(ङ्) गजेन्द्राणां(न्), नराणां(ञ्) च नराधिपम् ॥ 27 ॥

घोड्यांमध्ये अमृता बरोबर उत्पन्न झालेला उच्चैःश्रवानावाचा घोडा श्रेष्ठ हत्तींमध्ये ऐरावत आणि मनुष्यांमध्ये राजा मला समज .

आयुधानामहं(वँ) वज्रं(न्), धेनूनामस्मि कामधुक् ।

प्रजनश्चास्मि कन्दर्पः(स्), सर्पाणामस्मि वासुकिः ॥ 28 ॥

मी शस्त्रांमध्ये वज्र आणि गाईंमध्ये कामधेनू आहे .शास्त्रोक्त रीतीने प्रजोत्पत्तीचे कारण कामदेव मी आहे . सर्पांमध्ये सर्पराजवासुकी मी आहे .

अनन्तश्चास्मि नागानां(वँ), वरुणो यादसामहम् ।

पितृणामर्यमा चास्मि, यमः(स्) सं(यँ)यमतामहम् ॥ 29 ॥

मी नागांमध्ये शेषनाग आणि जलचरांचा अधिपतीवरून देव आहे आणि पितरांमध्ये अर्थमानावाचा पितर आणि शासन करणाऱ्यांमध्ये यमराज मी आहे .

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां(ङ्), कालः(ख्) कलयतामहम् ।

मृगाणां(ञ्) च मृगेन्द्रोऽहं(वँ), वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ 30 ॥

मी वैत्यांमध्ये प्रल्हाद आणि गणना करणाऱ्यांमध्ये समय आहे .तसेच पशुंमध्ये मृगराज सिंह आणि पक्षांमध्ये मी गरुड आहे .

**पवनः(फ्) पवतामस्मि, रामः(श्) शस्त्रभृतामहम् ।**

**झषाणां(म्) मकरश्चास्मि, स्रोतसामस्मि जाह्नवी ॥ 31 ॥**

मी पवित्र करणाऱ्या त वायु आणि शस्त्र धाऱ्यांतश्रीराम आहे .तसेच माशांत मगर आहे आणि नद्यांत श्री भागीरथी गंगा आहे .

**सर्गाणामादिरन्तश्च, मध्यं(ञ्) चैवाहमर्जुन ।**

**अध्यात्मविद्या विद्यानां(वँ), वादः(फ्) प्रवदतामहम् ॥ 32 ॥**

हे अर्जुना !सृष्टीचा आदी आणि अंत तसेच मध्यही मीच आहे .मी विद्यांतीलब्रह्मविद्या आणि परस्परा वाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केला जाणारा वाद मी आहे '

**अक्षराणामकारोऽस्मि, द्वन्द्वः(स्) सामासिकस्य च ।**

**अहमेवाक्षयः(ख्) कालो, धाताहं(वँ) विश्वतोमुखः ॥ 33 ॥**

मी अक्षरांतील अकारआणि समासांपैकी द्वन्द्वआहे .अक्षय काल म्हणजेच कालाचाही महाकाल तसेच सर्व बाजूंनी तोंडे असलेला विराट स्वरूप सर्वांचे धारण -पोषण करणारही मीच आहे .

**मृत्युः(स्) सर्वहरश्चाह-मुद्भवश्च भविष्यताम् ।**

**कीर्तिः(श्) श्रीर्वाक्च नारीणां(म्), स्मृतिर्मेधा धृतिः(ह) क्षमा ॥ 34 ॥**

सर्वांचा नाश करणारा मृत्यू आणि उत्पन्न होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण मी आहे .तसेच स्त्रियांमध्ये कीर्ती ,लक्ष्मी ,वाणी ,स्मृती ,मेधा ,धृती आणि क्षमा मी आहे .

**बृहत्साम तथा साम्नां(ङ्), गायत्री छन्दसामहम् ।**

**मासानां(म्) मार्गशीर्षोऽह- मृतूनां(ङ्) कुसुमाकरः ॥ 35 ॥**

तसेच गायन करण्याजोग्या वेदांमध्ये मी बृहत्सामआणि छंदांमध्ये गायत्री छंद आहे .त्याचप्रमाणे महिन्यांतील मार्गशीर्षआणि ऋतूतील वसंत मी आहे .

**द्यूतं(ञ्) छलयतामस्मि, तेजस्तेजस्विनामहम् ।**

**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि, सत्त्वं(म्) सत्त्ववतामहम् ॥ 36 ॥**

मी कपट करणाऱ्यांतील जुगार आणि प्रभावशाली पुरुषांचा प्रभाव आहे .मी जिंकणाऱ्यांचा विजय आहे . निश्चयी लोकांचानिश्चय आणि सात्विक पुरुषांचा सात्विक भाव आहे .

**वृष्णीनां(वँ) वासुदेवोऽस्मि, पाण्डवानां(न्) धनञ्जयः ।**

**मुनीनामप्यहं(वँ) व्यासः(ख्), कवीनामुशना कविः ॥ 37 ॥**

वृष्णियांमध्ये वासुदेव अर्थात् मी स्वतः तुझा मित्र , पांडवांमध्ये धनंजय म्हणजेच तू मूनीमध्ये वेदव्यास आणि कवींमध्ये शुक्राचार्य कवीही मीच आहे .

दण्डो दमयतामस्मि, नीतिरस्मि जिगीषताम् ।

मौनं(ञ्) चैवास्मि गुह्यानां(ञ्), ज्ञानं(ञ्) ज्ञानवतामहम् ॥ 38 ॥

दमन करणाऱ्यांचा दण्ड म्हणजे दमन करण्याची शकती मी आहे . विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीती मी आहे गुप्त ठेवण्यासारख्या भावांचा रक्षक मौन आणि ज्ञानवानांचे तत्वज्ञान मीच आहे .

यच्चापि सर्वभूतानां(म्), बीजं(न्) तदहमर्जुन ।

न तदस्ति विना यत्स्यान्- मया भूतं(ञ्) चराचरम् ॥ 39 ॥

आणि हे अर्जुना ! जे सर्व भूतांच्या उत्पत्तीचे कारण तेही मीच आहे . कारण असे चराचरातील एकही भूत नाही की , जे माझ्याशिवाय असेल

नान्तोऽस्ति मम दिव्यानां(वँ), विभूतीनां(म्) परन्तप ।

एष तूद्देशतः(फ्) प्रोक्तो, विभूतेर्विस्तरो मया ॥ 40 ॥

हे परंतपा ! माझ्या दिव्य विभूतींचा अंत नाही . हा विस्तार तर तुझ्यासाठी थोडक्यात सांगितला .

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं(म्), श्रीमदूर्जितमेव वा ।

तत्तदेवावगच्छ त्वं(म्), मम तेजों(म्)ऽशसम्भवम् ॥ 41 ॥

जी जी ऐश्वर्ययुक्त, कांतियुक्त आणि शक्तियुक्त वस्तू आहे, ती ती तू माझ्या तेजाच्या अंशाचीच अभिव्यक्ती समज.

अथवा बहुनैतेन, किं(ञ्) ज्ञातेन तवार्जुन ।

विष्टभ्याहमिदं(ङ्) कृत्स्न- मेकां(म्)शेन स्थितो जगत् ॥ 42 ॥

किंवा हे अर्जूना ! हे फार फार जाणण्याचे तुला काय प्रयोजन आहे. मी चा संपूर्ण जगाला आपल्या योगशकतीच्या केवळ एका अंशाने धारण करून राहिलो आहे .

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु

ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।